मा॰संपादक --------------------.

कृपया सोबतचा लेख प्रसिध्दीसाठी पाठवित आहोत. शेतमजुरांच्या किमान वेतनाची पुनर्रचना करण्याची शासनाने टाळाटाळ चालवली आहे. त्या संदर्भात हा लेख त्वरीत छापावा ही विनंती.

आपला विश्वासू,

## पागे समितीला आव्हान

डॉ. अभय बंग

आमच्या लहानपणी शाळेच्या पुस्तकात अेक गोष्ट होती - शुन्याचा फटका. कर्जाच्या आकड्यावर अेक शुन्य गुपचूपपणे वाढवून सावकार अेका निरक्षर गरीब शेतक-याला आयुष्यातून कसा उठवतो याची. कांहीशा अशाच प्रकारच्या करामती करुन पागे समितीने महाराष्ट्रातील शेतमजुरांसाठी व रोजगार हमी योजनेवरील मजुरासाठी कीमान मजुरी १९७४ मध्ये तीन रुपये व १९७८ मध्ये रु॰४/- काढली. यात पुनर्विचार करुन सुधारणा करण्यासाठी मार्च, १९८१ मध्ये शासनाने पुन्हा श्री॰वि॰स॰पागे, यांच्या अध्यक्षतेखाली तिस-यांदा समितीची नेमणूक केली.

किमान मजुरी ठरविण्यासाठी पागे समितीच्या मूळ पध्दतीचा अभ्यास केला असतां मला त्यांत गंभीर चूका आढळून आल्या. त्या थोडक्यांत अशा :

१] शेतमजुरांची कॅलरीजची आवश्यकता समितीने फार कमी धरली आहे. भारतातील सर्वोच्च वैद्यकिय संस्था आय॰सी॰एम॰आर॰ कठीण परिश्रम करणा-या पुरुषाला ३,९०० व स्त्रीला ३,००० कॅलरीज आवश्यक मानते. शेतमजुरांची कामे "कठीण परिश्रम " सदरांत मोडतात. पागे समितीने मात्र शेतमजुराला २,२०० कॅलरीज पुरेशा मानल्या आहेत. या आकड्याच्या समर्थनार्थ श्री॰पागे यांनी दिलेले आधार अशास्त्रीय व चूक आहेत.

२] मुलांना वयस्कांच्या अर्धा म्हणजे १,१०० कॅलरीज समितीने मानल्या आहेत. या मानण्याला कांहीही आधार नाही. वेगवेगळ्या वयोगटांच्या मुलांना वेगवेगळ्या प्रमाणांत १,१०० ते २,५०० पर्यन्त कॅलरीज लागतात.

३] आहाराच्या सर्व गरजा केवळ ज्वारीने पूर्ण होतील असे समितीने मानले आहे. माणसाला [शेतमजूर माणूस मानला तर] जिवंत राहण्यासाठी ज्वारीशिवाय डाळ व इतर प्रकारच्या अन्नाचीही गरज असते. हे आजकाल चौथीतल्या, पांचवीतल्या मुलांना देखील विज्ञान म्हणून शिकविण्यांत येते. पण समितीतील विद्वानांना विज्ञानाची गरज वाटली

नसावी कीमत कमी ज्वारी व डाळीच्या गरजा तरी आय. सी. एम. आर. च्या शिफारशीनुसार धराच्या, इतर प्रकारचे अन्न [ दूध , तेल साखर , भाजी , फळे ] पुरेशा प्रमाणात मजुरी व्दारे देणे हे आज शक्य नाही हे मानून ते आज मजूर जितक्या प्रमाणात प्रत्यक्ष खातो [ २०० कॅलरिज ] तेवढेच द्यावे.

४] मजूर कुंटुंबाच्या सर्व जिवनावश्यक गरजा धान्याच्या रुपात काढल्यानुंतर त्याचे रोख मध्ये रुपांतर करतांना समितीने ज्वारीचा रेशनच्या दुकानातील दर वापरला आहे. ज्वारीचा दर हा आधारच मुळात योग्य नाही त्याऐवजी ग्रामीण महागाई निर्देशांक वापरायला हवा. त्यातही ज्वारीचा रेशनचा दर वापरुन रोख मजुरी कीमत कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. खाण्यापुरत्या ज्वारीसाठी रेशनचा दर वापरावा पण इतर गरजा [ डाळ, इतर अन्न कपडा, ईंधन, औषध इ. ] खुल्या बाजारातून मजुराला विकत घ्याव्या लागत असल्याने त्यासाठी खुल्या बाजारातील दर वापरावा.

समितीच्या पध्दतीची चौकट स्वीकारुनही निव्वळ अितक्या साध्या चुका दुरुस्त केल्या तरी किमान मजुरी १२ रुपये येते. यात अजूनही ज्वारी व डाळी व्यतिरिक्त अितर प्रकारचे अन्न फारअपुरे आहे. आजार, गरोदर व बाळंतपण, म्हातारपण यासाठी कोहिही सोय नाही. घरात कीमत कमी दोन जणांनी मजुरी केली पाहिजे हे गृहीत धरले आहे [ पांढरेपेशांचा पगार काढतांना एकच कमावता माणूस गृहीत धरण्यात येतो. ]

" १२ रु. हा आकडा फार जास्त" असा तर्क करणा-यांनी खालील गोष्टी लक्षात घ्याव्या. -

१] सी. गोपालन या जगप्रसिध्द आहार शास्त्रज्ञाने शेतमजुराच्या किमान गरजा लक्षात घेऊन नुकत्याच केलेल्या हिशाबानेही किमान मजुरीही ११ रुपये आली आहे.

२] हरियाणा, पंजाब, केरळ अित्यादी प्रांतात किमान मजुरी १०रु. च्या वर आहे.

३] १२ रु. रोज देऊन व कुंटुंबातील दोन व्यक्तिंनी मजुरी करुनही मजुर कुंटुंबाचे सरासरी प्रतिव्यक्ती उत्पन्न १२० रु. महिना येते भारताचे सरासरी प्रतिव्यक्ती उत्पन्न १९८० मध्ये १४० रु. होते. म्हणजेच ही मजुरी देणे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या शक्तीबाहेरील गोष्ट नाही.

४] किमान मजुरी व रोजगार हमी हे मजुराचे कायदेशीर हक्क आहेत. भीक नाही.

समितीच्या पध्दतीतील या अत्यंत महत्वाच्या चुका व त्यांना दुरुस्त करुन किमान मजुरीच्या केलेला हिशोब याची मी स्वत: श्री. पागे यांच्याशी विस्ताराने शास्त्रीय आधारांसहीत चर्चा केली व समितीच्या सर्व सदस्यांनाही ही माहिती वेळोवेळी पाठविली.

महाराष्ट्रातल्या अनेक वर्तमान पत्रांनी व नियतकालिकांनी १९८१ मध्ये या वरील लेख प्रसिध्द करुन या मुद्दयांवर जाहिर विचार मंथन सुरु केले. महाराष्ट्रातील शेतमजुरांच्या महत्वाच्या युनियनांनी व नेत्यांनीच नव्हे तर शरद जोशी व शेतकरी संघटनेने देखील या हिशोबाचे जाहीर समर्थन केले. महाराष्ट्रातील जवळपास चाळीस अपक्ष संस्था व संघटनांची पागे समितीला निवेदने देवून या चुकांची दुरुस्ती करण्याची विनंती केली. मेडिको फ्रेंड सर्कल या डॉक्टरांच्या शास्त्रीय संघटनेने व जनविज्ञान चळवळीने देखील या तर्कांनी शास्त्रीय दृष्टया तपासून मान्यता दिली व पागे समितीने ते मान्य करावे अशी विनंती केली.

हे सर्व होऊनही नव्या पागे समितीने यापैकी एकही मुद्दयावर आजपर्यंत मला साधे उत्तर दिलेले नाही किंवा आपली पध्दत व आकडे बरोबर कसे हे जाहिरपणे सांगितलेले नाही. आणि ३१ जानेवारी १९८२ रोजी शासनाला दिलेल्या आपल्या अंतीम अहवालात व शिफारसीत पागे समितीने यापैकी एकही चूक दुरुस्त केलेली नाही. केवळ गेल्या चार वर्षात झालेल्या भाववाढीनुसार झोन ४ व रो. ह. यो. मधील किमान मजुरी ४ रुपयावरुन ६ रुपयावर वाढवली आहे. त्यावरील झोन्सना यापेक्षा प्रत्येकी १ रु. जास्त दिला आहे.

शासनाची तत्परता अशी की समितीने हा रिपोर्ट सादर करुन जवळपास वर्ष होत आले असूनही त्यावर काहिही कारवाई झालेली नाही. त्यामुळे शेतीवर रोजगार हमी योजनेत मजुरी करणा-या महाराष्ट्रातील जवळपास ६० लक्ष शेतमजुरांना [ शिवाय अनेक लहान शेतक-यांना ] १२ रु. ऐवजी ६ रु. ही पागे समितीची चूक मजुरीही न मिळता जुनीच ४ रु. ही किमान मजुरी लागू होत आहे. संघटीत क्षेत्रातील कर्मचा-याचे पगार महागाई निर्देशांकानुसार वर्षातून अनेक वेळा ताबडतोब वाढतात. पण उपाशी शेत मजुरांच्या किमान मजुरीतल्या मुलभूत चुका दुरुस्त होणे तर बाजुला राहिले, साधी महागाई नुसार सुधारणाही ४ वर्षे होत नाही, याला काय म्हणावे ?

लोक शाहितील शासन व पागे समिती सारखी विव्दानांची समिती या दोघांनी आपल्या चुकाबंद्दल चर्चाही करावयाची नाही व त्या दुरुस्तही करायच्या नाहीत असे धोरण ठरविले आहे की काय अशी शंका याची इतकी ही शांतता व निष्क्रीयता बोलकी आहे. पुन्हा पुन्हा पाठवलेल्या निवेदनांना तर्कांना व प्रश्नांना काहिही उत्तर न देण्याचा समितीच्या भूमिकेमुळे निरुपाय होऊन मी पागे समितीला महाराष्ट्रातील ६० लाख शेतमजुरांच्या वतीने आव्हान देतो आहे की तिने वरील आक्षेपाचे व तर्कांचे शास्त्रीय आधारांवर उत्तर द्यावे अन्यथा किमान मजुरीचा हिशोब हा मानवीय दृष्टीकोन व शास्त्रीय आधारावर आहे. हा पांघरलेला बुरखा फेकून देऊन श्रीमंत शेतक-यांची समर्थ लॉबी परवानगी देईल तितकाच किमान मजुरीचा आकडा आम्ही काढायला बांधलेले आहोत व तीच आमची खरी पध्दत आहे हे जाहीर रीत्या मान्य करावे.

---

डॉ. अभय बंग, एम. डी.
गोपुरी, वर्धा. ४४२-११४.